सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

**संदर्भ क्र. विविमं/२०२६-२७/३०७** **दि. २३/०९/२०२६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी**
**संलग्नित (फक्त पुणे जिल्ह्यातील) महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.**

**विषय : विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ दावे व हरकतीच्या कालावधीत जनजागृती मोहीम राबविण्याबाबत.**
**संदर्भ क्र : उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) पुणे यांचे उपजिभूसं/१७/निवडणूक-१/कावि/२०/२०२६ दि. २२/०९/२०२६ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

वरील संदर्भीय पत्रानुसार, राज्यात विशेष सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रम दि. ३० जून ते ४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दि. ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रमाच्या प्रथम टप्यात मतदार सर्वसाधारण निवासी असल्याबद्दलच्या वस्तुस्थितीची पडताळणी करण्यात येवून घरोघरी सर्वेक्षणाच्या वेळी गणना प्रपत्र भरून दिलेल्या मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश करण्यात आलेला आहे. मात्र मतदार यादीतील पत्त्यावर आढळून न आलेल्या तसेच अन्यत्र स्थलांतरित झालेल्या मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश करता आलेला नाही. त्याच प्रमाणे ऑक्टोबर २०२४ नंतर मतदार यादीच्या पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविला न गेल्याने तदनंतर १८ वर्षे पूर्ण झालेले नव मतदार प्रारूप मतदार यादीत समाविष्ट नाहीत.

प्रारूप मतदार याद्यांच्या अनुषंगाने दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. हा टप्पा मतदार यादित नावे नोंदवण्यावर केंद्रित असून या कालावधीत दावे व हरकतीच्या माध्यमातून कोणताही पात्र नागरिक मतदार यादीतून सुटणार नाही, याची सुनिश्चिती करावयाची आहे. या कालावधीत दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व पात्र नवमतदारांना तसेच सध्याच्या रहिवासाच्या ठिकाणी स्थलांतरित झाल्यामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट होऊ न शकलेल्या नागरिकांना प्रपत्र-६ व घोषणापत्र भरून नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध आहे.

**या टप्याचे शेवटचे १५ दिवस शिल्लक असून या कालावधीत मतदारयादीत नवमतदार तसेच स्थलांतरीत मतदारांचा समावेश होण्याकरीता विशेष प्रयत्न अपेक्षित आहेत. या टप्याचे कमी दिवस शिल्लक असून प्रारुप यादीत वगळणी झालेले व १८ ते १९ वयोगटातील आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ परिसरातील विभागामधील पात्र विद्यार्थ्यांची मतदारयादित नवमतदार यांची नोंदणी करणेसाठी गुरुवार, दि. २४ सप्टेंबर, २०२६ रोजी स. ११.३० वा. व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजीत केली आहे. तरी, आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ परिसरातील विभागामधील संबंधितांना या सभेस उपस्थित राहणेबाबत अवश्य सूचित करावे.**

त्याअनुषंगाने पुर्ततेकरिता शहरी/तालुका/गांव पातळी स्तरावर मतदार नोंदणीबाबत सर्व महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ परिसरातील विभाग यांनी विशेष मोहिम राबविण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात दि. १५ व १६ सप्टेंबर, २०२६ रोजी सर्व महाविद्यालयातील एक नोडल अधिकारी व एक विद्यार्थी यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्यानुसार, प्रत्येक प्रशिक्षण दिलेल्या विद्यार्थ्याने आपल्या महाविद्यालयातील नवमतदारांची ऑनलाईन नोंदणी दि.२८,२९,३० सप्टेंबर, २०२६ रोजी करुन घ्यावी.

या मतदार नोंदणीचे उद्दिष्ट केवळ जनजागृती करणे नसून, प्रत्येक पात्र विद्यार्थी, नवमतदार यांची प्रत्यक्ष मतदार नोंदणी पूर्ण करणे हा आहे. महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील एकही विद्यार्थी मतदार नोंदणी करणेपासून वंचित राहणार याची सर्वस्वी जबाबदारी मा. प्राचार्य यांची असेल. त्यामुळे यांचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करून आवश्यकतेनुसार विशेष मोहिमा अधिक तीव्र करण्यात याव्यात.

दि.२८ ते ३० सप्टेंबर, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या नवमतदारांची ऑनलाईन नोंदणीची सूचना महाविद्यालयातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याकरीता आपल्या महाविद्यालय/परिसंस्थातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह /उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनी भागात प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून देऊन महाविद्यालय/परिसंस्था/विभागाच्या स्तरावर नवमतदारांची ऑनलाईन नोंदणीची मोहीम राबविण्यात यावी.

सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, सांस्कृतिक अधिकारी व संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे. कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# उपजिल्हाधिकारी (भूसंपादन ) क्र.17,पुणे यांचे कार्यालय
## जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बी. विंग ,पुणे

E Mail ID- sloa17pune@gmail.com


क्र.उपजिभूसं/17/निवडणूक-1/कावि/22/2026 दि. 23/ 9/2026

प्रति,

सर्व विद्यापीठे , महाविद्यालये
माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा

**विषय:-** विशेष सखोल पुनरिक्षण **कार्यक्रम २०२६ -दावे व हरकतीच्या कालावधीत जनजागृती मोहीम कार्यक्रम आयोजीत करणेबाबत. दि.२४/९/२०२६ रोजी सकाळी ११.३० वा. व्हिडिओ कॉन्फरन्स**

महोदय,

मा.मुख्य निवडणूक अधिकारी म.रा.यांचे कडील पत्र क्र.संकिर्ण-२०२६/प्र.क्र.४४/निवडणूक -५ दि.१५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या आदेशानुसार दि. 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रमाच्या प्रथम टप्प्यात मतदार सर्वसाधारण निवासी असल्याबद्दलच्या वस्तुस्थितीची पडताळणी करण्यात येवून घरोघरी सर्वेक्षणाच्या वेळी गणना प्रपत्र भरून दिलेल्या मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश करण्यात आलेला आहे. मात्र मतदार यादीतील पत्त्यावर आढळून न आलेल्या तसेच अन्यत्र स्थलांतरित झालेल्या मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश करता आलेला नाही. **त्याच प्रमाणे ऑक्टोबर 2024 नंतर मतदार यादीच्या पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविला न गेल्याने तदनंतर 18 वर्षे पूर्ण झालेले नव मतदार प्रारूप मतदार यादीत समाविष्ट नाहीत.** प्रारूप मतदार याद्यांच्या अनुषंगाने दावे व हरकती दाखल करण्यासाठी 31 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर 2026 असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. हा टप्पा मतदार यादित नावे नोंदवण्यावर केंद्रित असून या कालावधीत दावे व हरकतीच्या माध्यमातून कोणताही पात्र नागरिक मतदार यादीतून सुटणार नाही, याची सुनिश्चिती करावयाची आहे. या कालावधीत **दि. 1 ऑक्टोबर 2026 रोजी किंवा त्यापूर्वी 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व पात्र नवमतदारांना तसेच सध्याच्या रहिवासाच्या ठिकाणी स्थलांतरित झाल्यामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट होऊ न शकलेल्या नागरिकांना प्रपत्र-6 व घोषणापत्र भरून नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध आहे.**

या टप्याचे कमी दिवस शिल्लक असून प्रारुप यादीत वगळणी झालेले व १८ ते १९ वयोगटातील पात्र विद्यार्थ्याचे या कालावधीत मतदारयादित नवमतदार यांची नोंदणी करणेसाठी आपले अधिनस्त सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, विद्यापीठे , महाविद्यालयातील विद्यार्थ्यासाठी विशेष मोहिमा, शिबिरे दि.२८,२९ व ३० सप्टेंबर या कालावधीत आयोजीत करणेबाबत **दि.२४/९/२०२६ रोजी सकाळी ११.३० वा. व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजीत केली आहे**. तरी आपले स्तरावरुन सबंधितांना उपस्थित राहणेच्या सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

( अमिता तळेकर )
उपजिल्हाधिकारी तथा
स्वीप नोडल अधिकारी ,पुणे

# उपजिल्हाधिकारी (भूसंपादन ) क्र.17,पुणे यांचे कार्यालय
## जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बी. विंग ,पुणे

E Mail ID- sloa17pune@gmail.com

क्र.उपजिभूसं/17/निवडणूक-1/कावि/ 20 /2026 दि. 22/ 9/2026

प्रति,

1.मा. कुलसचिव
सावित्रीबाई फुले विद्यापिठ पुणे
२.भारती विद्यापिठ , पुणे
३.यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ , पुणे
४.एम. आय. टी. पुणे
५.डी. वाय. पाटील, पुणे

विषयः- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ -दावे व हरकतीच्या कालावधीत दि.२८,२९,३० सप्टेंबर जनजागृती मोहीम राबविण्याबाबत.

संदर्भ:-१.मा.मुख्य निवडणूक अधिकारी म.रा.यांचे कडील पत्र क्र.संकिर्ण-२०२६/प्र.क्र.४४/निवडणूक -५ दि.१५ सप्टेंबर २०२६
२.या कार्यालयाकडील पत्र क्र. उपजिभूसं/17/निवडणूक-1/कावि/ 13 /2026 दि.16/9/2026

उपरोक्त विषयास अनसुरुन आपणास कळविण्यात येते की, मा.मुख्य निवडणूक अधिकारी , महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांचेकडील वरील संदर्भिय पत्राचे अनुषंगाने महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रम दि.30 जून ते 4 नोव्हेंबर 2026 या कालावधीत राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दि. 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रमाच्या प्रथम टप्प्यात मतदार सर्वसाधारण निवासी असल्याबद्दलच्या वस्तुस्थितीची पडताळणी करण्यात येवून घरोघरी सर्वेक्षणाच्या वेळी गणना प्रपत्र भरून दिलेल्या मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश करण्यात आलेला आहे. मात्र मतदार यादीतील पत्त्यावर आढळून न आलेल्या तसेच अन्यत्र स्थलांतरित झालेल्या मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश करता आलेला नाही. त्याच प्रमाणे ऑक्टोबर 2024 नंतर मतदार यादीच्या पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविला न गेल्याने तदनंतर 18 वर्षे पूर्ण झालेले नव मतदार प्रारूप मतदार यादीत समाविष्ट नाहीत. प्रारूप मतदार याद्यांच्या अनुषंगाने दावे व हरकती दाखल करण्यासाठी 31 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर 2026 असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. हा टप्पा मतदार यादित नावे नोंदवण्यावर केंद्रित असून या कालावधीत दावे व हरकतीच्या माध्यमातून कोणताही पात्र नागरिक मतदार यादीतून सुटणार नाही, याची सुनिश्चिती करावयाची आहे. या कालावधीत दि. 1 ऑक्टोबर 2026 रोजी किंवा त्यापूर्वी 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व पात्र नवमतदारांना तसेच सध्याच्या रहिवासाच्या ठिकाणी स्थलांतरित झाल्यामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट होऊ न शकलेल्या नागरिकांना प्रपत्र-6 व घोषणापत्र भरून नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध आहे. या टप्प्याचे

शेवटचे 15 दिवस शिल्लक असून या कालावधीत मतदारयादित नवमतदार तसेच स्थंलातरीत मतदारांचा समावेश होण्याकरीता विशेष प्रयत्न अपेक्षित आहेत.

त्याअनुषंगाने पुर्ततेकरिता शहरी /तालुका / गांव पातळी स्तरावर मतदार नोंदणीबाबत सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, विद्यापीठे व त्याअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विशेष मोहिम हाती घेण्याकरिता सबंधितांना आपले स्तरावरुन सूचना देणेत आल्या असतील तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक -१५/९/२०२६ व १६/०९/२०२६ रोजी सर्व कॉलेजमधील एक नोडल अधिकारी (विद्यार्थी) यांना प्रशिक्षण देणेत आलेले आहे.

त्यानुसार प्रत्येक प्रशिक्षण दिलेल्या विद्यार्थ्याने महाविद्यालयातील नवमतदारांची ऑनलाईन नोंदणी दि.२८,२९,३० रोजी करुन घ्यावी. याकरिता दिनांक -२८,२९,३० रोजी महाविद्यालयांमध्ये विशेष प्रसिध्दी देणेत यावी. जेणेकरुन महाविद्यालयामंधील एकही विद्यार्थी मतदार नोंदणी करणेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. नवमतदारांसाठी नोंदणी फॉर्म भरणेकरिताचा फ्लो खालीलप्रमाणे आहे.

[Check Eligibility]
↓
(Age 18+ and Indian Citizen?)

YES — NO → [Not Eligible]

YES ↓
[Choose Method: Online or Offline]

↓
[Option 1: Online Process]
↓
1. Visit the Voters' Service Portal (voters.eci.gov.in).
BLO.
↓
2. Create an account or log in manually to the portal.
↓
3. Click on 'New Registration for photocopies General Electors (Form 6)'.
↓
4. Fill in personal details to your (Name, DOB, Address, etc.).

↓
[Option 2: Offline Process]
↓
1. Collect 'Form 6' from the nearest Voter Center or
↓
2. Fill in all details with a pen.
↓
3. Attach self-attested of required documents.
↓
4. Submit the physical form local ERO or BLO.
↓

5. Upload scanned documents acknowledgment (Photo, Age & Address proof).

↓

6. Verify details and 'Submit'.

↓

7. Note down the 'Reference ID' for tracking.

5. Get a physical receipt.

↓

[BLO Field Verification]
(An official visits to verify details)

↓

[Application Approval/Decision]

↓

[Name Added to Electoral Roll (Voter List)]

↓

[Voter ID Card delivered via Speed Post]

या मोहिमेचे उद्दिष्ट केवळ जनजागृती करणे नसून, प्रत्येक पात्र विद्यार्थी , नवमतदार यांची प्रत्यक्ष मतदार नोंदणी पूर्ण करणे हे आहे. महाविद्यालयामंधील एकही विद्यार्थी मतदार नोंदणी करणेपासून वंचित राहणार याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची असेल. त्यामुळे आपले अधिनस्त सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, विद्यापीठे , महाविद्यालये यांचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करून आवश्यकतेनुसार विशेष मोहिमा अधिक तीव्र करण्याच्या सूचना सबंधितांना देण्यात याव्यात.

या अनुषंगाने वेळोवेळी घेणेत आलेली शिबिरे यांचे फोटो व आकडेवारी या कार्यालयाकडून स्प्रेडशिट पाठविली जाईल त्यामध्ये भरुन घेणेची दक्षता घेणेत यावी.

( सतिश राऊत )
प्र.जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी ,पुणे

प्रत:- १.मा. मुख्य निवडणूक अधिकारी , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांजकडे माहितीस्तव सविनय सादर.
२.मा.विभागीय आयुक्त , पुणे विभाग पुणे ( सामान्य प्रशासन विभाग ) यांजकडे सविनय सादर.
३.उपजिल्हा निवडणूक अधिकारी , पुणे यांचेकडे माहितीसाठी.